वाचले :- 1) मुंबई पोलीस अधिनियम 1951(सुधारणा अध्यादेश) महाराष्ट्र पोलीस अधिनियम 2014 चे कलम 37 (1)(3) मधील तरतूदीनुसार

2) मा. पोलीस अधिक्षक सातारा यांचेकडील पत्र क्र. जिविशा-7/प्र.आदेश/2017-853 दिनांक 29/01/2017

क्र. डिसी/एमएजी/2/एस.आर/05/2017

जिल्हादंडाधिकारी कार्यालय, सातारा
सातारा, दिनांक 02/02/2017

आदेश

ज्या अर्थी, मा. पोलीस अधिक्षक सातारा यांचेकडील पत्र क्र. जिविशा-7/प्र.आदेश/2017-853, दिनांक 29/01/2017 1) **सण/उत्सव :-** सातारा जिल्ह्यात सालाबादप्रमाणे दिनांक 23/01/2017 ते दिनांक 03/02/2017 पर्यंत बोरगांव पोलीस ठाणे हददीतील नागठाणे गावातील श्रीराम देवाची यात्रा सुरु असून सदरची यात्रा ही दिनांक 03/02/2017 पर्यंत सुरु राहणार आहे. तसेच दिनांक 11/2/2017 ते दिनांक 20/2/2017 या कालावधीत सातारा तालुका पोलीस ठाणे हद्दीतील परळी सज्जनगड या ठिकाणी श्री रामदास स्वामींची वार्षिक यात्रा संपन्न होणार आहे. या यात्रा ठिकाणी मोठया प्रमाणावर भाविक येत असल्याने तेथे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. नमुद कालावधीत विविध पक्ष/ संघटना यांचेकडुन त्यांच्या विविध मागण्यासाठी आंदोलने,मोर्चा,उपोषण इत्यादीमुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

2) **जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक 2017:-** सातारा जिल्हयात दिनांक 11/01/2017 रोजी पासून मा. राज्य निवडणूक आयोग यांनी आचारसंहिता चालू केली आहे. 64 जिल्हा परिषद गट व 128 पंचायत समिती गण यासाठी दिनांक 01/02/2017 ते 06/02/2017 या कालावधीत नामनिर्देशन पत्र दाखल होणार आहेत. निवडणूकीच्या अनुषंगाने विविध राजकीय पक्ष/संघटनेचे कार्यकर्ते व निवडणूक लढवू इच्छूक उमेदवार यांच्या सदयस्थितीत मोठया प्रमाणावर राजकीय हालचाली सुरु झालेल्या असून त्या अनुषंगाने कोणताही कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

3) **आरक्षण अनुषंगाने आंदोलनाबाबत :-** राज्यात मराठा,मुस्लीम तसेच धनगर समाजास आरक्षण मिळावे याकरीता विविध राजकीय पक्षांच्या वतीने विविध सभा/कार्यक्रमाचे वेळी आरक्षण अनुषंगाने वक्तव्य केली जात आहेत. या पार्श्वभुमीवर मराठा, तसेच धनगर समाजाचे नेत्यांकडून आरक्षणाच्या मागणीसाठी राज्यभर आंदोलन करण्याचा इशारा दिलेला आहे. याचाच भाग म्हणुन जिल्हयातील मराठा तसेच इतर विविध संघटना व धनगर समाज संघटना यांच्या वतीने आरक्षणबाबत आंदोलने करण्याची शक्यता आहे.

4) **तिरंगा प्रतिष्ठान धरणे आंदोलन बाबत :-** श्रीमती हर्षदा शेडगे यांचे दिनांक 27/7/2015 रोजी पासुन धरणे आंदोलन सुरु आहे. सुभाषचंद्र बोस व हुतात्मा स्मारकाची उर्वरीत जागा तिरंगा विकास प्रतिष्ठान सातारा यांना मिळावी, तसेच रविंद्र क्षिरसागर व संबंधीत पोलीस यांना निलंबीत करावे तसेच आरोपीस कडक शासन मिळावे या मागणीकरीता बेमुदत ठिय्या आंदोलन सुरु आहे. दिनांक 17/8/2015 रोजी मा ना. रामराजे नाईक निंबाळकर यांचे गाडीवर चप्पल फेकलेचे कारणावरुन सातारा शहर पोलीस ठाणेस गुरनं 220/15 म.पो.का. कलम 37(1)(3)/135 प्रमाणे गुन्हा दाखल आहे या अनुषंगाने कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

5) **शेतकरी व इतर संघटना यांचे आंदोलनाबात :-** बळीराजा, स्वाभिमानी व इतर शेतकरी संघटना या शेतक-यांचे कर्ज माफी करावी, विद्युत बिले माफ करावी, शेतीमालाला दर मिळावा तसेच ऊसाची थकीत बिले शेतक-यांच्या खात्यावर जमा करावीत, तसेच भारतीय किसन सभा व इतर शेतकरी संघटना यांचे वतीने गतवर्षीचे गाळप हंगामाचे जादा 175 रुपये प्रमाणे जादा रक्कम शेतक-यांना दयावी या करीता मोर्चा इत्यादी प्रकारची आंदोलने शेतकरी व इतर संघटना आक्रमक होवुन करण्याची शक्यता नाकारता येत नाही.

6) **अतिक्रमण :-** रस्त्याच्याकडेलाच शासकिय जागेत झालेली अतिक्रमणे सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडून काढली जातात. इतर वेळी स्थानिक नागरिकांकडून अतिक्रमण काढतेवेळी जिवित व वित्त हाणी होवून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

7) **NH-4 :-** राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 4 चे सहापदरीकरण अदयाप सातारा जिल्हयात पूर्ण झाले नाही. सदर सहापदरीकरणाचे काम अत्यंत संथ गतीने चालू आहे. तसेच कामाचा दर्जा नित्कृष्ठ स्वरुपाचे असल्याचे कारणावरुन

रस्त्यावरील अपघाताचे वेळी जनतेत राग धुसमुसत असतो. या कारणावरुन जनता, राजकीय पक्ष, समाजसेवक, स्वयंसेवी संस्था आक्रमक होवून विविध प्रकारची आंदोलने राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 4 वर करु शकतात.

8) श्रमिक मुक्ती दल :- श्रमिक मुक्ती दलाचे वतीने जिल्हयातील ध्रणग्रस्तांना योग्य पुनर्वसन, मोबदला,7/12 वर नावे चढविणे इत्यादी मागण्याकरीता जलसमर्पण,मोर्चा, सारखी आंदोलने करत आहेत.

9) मनसे पक्ष :- मनसे पक्ष वतीने श्री.संदिप मोझर यांचे नेतृत्वात सरकारच्या नोटाबंदीच्या निर्णयाने शेतक-यांना नुकसान झाले असुन शेतक-यांवर असणारे सर्व कर्ज माफ करावे व त्यांना कर्जमुक्त करावे या मागणी करीता मनसे पक्ष सक्रिय झाला आहे.तसेच रयत कुमुदा साखर कारखान्याने शेतकरी व वाहतुकदार यांचे पैसे दयावेत या मागणीकरीता ही मनसे पक्षाचे वतीने मोर्चा उपोषण आंदोलने पार पडली आहेत तसेच यापुढे तिव्र आंदोलन करण्याचे निवेदन ही त्यांनी दिले आहे.

वरील सर्व बाबी लक्षात घेता सातारा जिल्हयात कोणताही अनुचित प्रकार घडू नये, तसेच कायदा व सुव्यवस्था आबाधित रहावी यासाठी दिनांक 01/02/2017 रोजीचे 07.00 ते दिनांक 15/02/2017 चे 24.00 वा. पर्यंत संपूर्ण सातारा जिल्हयात मुंबई पोलीस अधिनियम 1951 चे कलम 37(3) अन्वये जमावबंदी व सदरच्या कायदयाचे कलम 37(1) अन्वये शस्त्रबंदी आदेश लागू होणेस विनंती आहे. तसेच सदर आदेशाचे कलम 37(1)(3) मधुन या कालावधीत शांतता पूर्ण साजरे होणारे सण, उत्सव, यात्रा या प्रकारचे कार्यक्रम वगळण्यास विनंती केली आहे.

त्याअर्थी, मी भारत वाघमारे, अपर जिल्हादंडाधिकारी, सातारा मला असलेल्या अधिकारान्वये मुंबई पोलीस अधिनियम 1951 (सुधारणा अध्यादेश) महाराष्ट्र पोलीस अधिनियम 2014 चे कलम 37 (1) (3) अन्वये संपूर्ण सातारा जिल्हयात जमावबंदी व शस्त्रबंदी आदेश संपूर्ण सातारा जिल्ह्यात सण, यात्रा व उत्सवाचे कार्यक्रम वगळून दिनांक 03/02/2017 रोजीचे सकाळी 00.00 ते दिनांक 15/02/2017 चे 24.00 वाजेपर्यंत शस्त्र बंदी व जमावंबदी आदेश जारी करीत आहे.

वरील कालावधीत खालील कृत्ये करणेस मनाई करीत आहे.

अ) शस्त्र, सोटे, तलवारी, भाले, बंदूका, सु-या, काठया किंवा शारीरीक इजा करणेसाठी वापराता येईल अशी कोणतीही वस्तु बरोबर नेणे.

आ) कोणताही दाहक पदार्थ किंवा स्फोटक पदार्थ बरोबर नेणे.

इ) दगड किंवा अस्त्र, सोडावयाची अस्त्र, फेकरवायची हत्यार किंवा साधणे बरोबर घेणे, जमा किंवा तयार करणे.

ई) व्यक्तीची अगर प्रेते किंवा त्यांचे प्रतिमाचे प्रदर्शन करणे.

उ) सार्वजनिक रितीने घोषणा करणे, गाणी म्हणणे किंवा वाद्य वाजवणे, सभ्यता अगर निती या विरुध्द असतील अशी किंवा राज्याची असतील अशी किंवा राज्याची शांतता धोक्यात येईल असे प्राधिका-यास वाटेल अशी भाषणे करणे हावभाव करणे सोंग आणणे अशी मनाईचे उल्लघन करुन जर कोणताही इसम अशी कोणतीही वस्तु बरोबर घेवून जाईल किंवा कोणत्याही जिन्नस किंवा वस्तु तयार करणे किंवा त्यांचा लोकांत प्रसार करणे. अशा मनाईचे उल्लंघन करुन जर कोणताही इसम अशी कोणतीही वस्तु बरोबर घेवून जाईल किंवा कोणताही जिन्नस दाहक पदार्थ किंवा अस्त्र जवळ बाळगतील तर तो कोणत्याही पोलीस अधिका-याकडून निशस्त्र केले जाणेस किंवा दाहक पदार्थ किंवा स्फोटक पदार्थ क्षेपणास्त्र त्यांच्याकडून जप्त केले जाण्यास पात्र असेल आणि अशा त-हेने जप्त केलेली वस्तु दाहक पदार्थ,स्फोटक पदार्थ किंवा क्षेपणास्त्र हे सरकार जमा होईल. पोटकलम (3) अन्वये असलेल्या अधिकारान्वये सार्वजनिक सुव्यवस्था राखणेसाठी कोणत्याही जामवास किंवा मिरवणूकीस वरील कालावधीत व कार्यक्षेत्रात या आदेशान्वये मनाई करीत आहे.

मुंबई पोलीस अधिनियम 1951 (सुधारणा अध्यादेश) महाराष्ट्र पोलीस अधिनियम 2014 चे कलम 37 (1) (3) मधील या हुकुमाच्या तरतुदी खालील नमुद केलेल्या इसमाना लागू होणार नाही.

1. शासनाची सेवा करणारे किंवा नोकरी करणेच्या कामी ज्यांच्या वरीष्ठांनी निर्दीष्ट केलेवरून अगर त्यांना कर्तव्याच्या स्वरुपामुळे अशी खंड 1 मध्ये उल्लेखलेल्या पैकी वस्तु धारण करणे किंवा देणे आवश्यक आहे.

2. ज्यांना ज्यांना शारिरीक दुर्बलतेच्या कारणावरुन जिल्हादंडाधिकारी अगर त्यांना प्राधिकृत केलेले अधिका-याना लाठी किंवा काठी वापराणेस परवानगी दिली असेल अशी व्यक्ती.

3. सदरचा आदेश यात्रा, धार्मिक कार्य, लग्न विधी कार्य तसेच अत्यविधी कार्यास लागू होणार नाही.

4. ज्या लोकांना शांततेचा मार्गाने एकत्र जमून कोणताही कार्यक्रम साजरा करावयाचा असेल त्याचवेळी पोलीस अधिक्षक, संबंधित उपविभागीय पोलीस अधिकारी, तसेच संबंधित पोलीस स्टेशनचे प्रभारी पोलीस निरिक्षक यांची आगावू परवानगी घेतली असेल तर त्यांना सदरचा आदेश लागू होणार नाही.

सदरचा आदेश हा माझ्या सही शिक्यानिशी दिनांक 02/02/2017 रोजी काढण्यात आला आहे.

सही--
भारत वाघमारे
अपर जिल्हादंडाधिकारी सातारा

प्रत :- पोलीस अधिक्षक सातारा यांचेकडे माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषीत.

प्रत :- उपविभागीय दंडाधिकारी ----------यांचेकडे माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

प्रत :- उपविभागीय पोलीस अधिकारी ---------- यांचेकडे माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.

प्रत :- कार्यकारी दंडाधिकारी ---------- यांचेकडे माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.

प्रत :- सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी, ---------- पोलीस स्टेशन यांचेकडे माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

प्रत :- जिल्हा माहिती अधिकारी सातारा यांचेकडे स्थानिक वृत पत्रामध्ये प्रसिध्दी साठी.

प्रत :- जिल्हा सूचना विज्ञान अधिकारी सातारा यांचेकडे शासकीय संकेत स्थळावर प्रसिध्दी साठी.

प्रत :- मॅनेजर येरवडा प्रिटींग प्रेस पुणे यांचेकडे राजपत्रात प्रसिध्दी साठी.

Kawade

अपर जिल्हादंडाधिकारी सातारा करिता